| | |
|---|---|
| (QR code) | **नियमित दिवाणी दावा क्र.९६३/२०२२ नि.क्र.३२ वरील आदेश**<br>(अधिघोषीत दिनांक १० सप्टेंबर, २०२४)<br>**वनिता व इतर – वि.– मनोहर व इतर**<br>CNR No. MHLA060024582022 |

प्रस्तुत अर्ज वादी यांनी त्यांच्याविरुध्द निशाणी क्र.२९ खाली झालेला विना म्हणणे आदेश रद्द होवून म्हणणे दाखल करण्यास परवानगी मिळण्याचा अर्ज सादर केला आहे.

**०२.** वादीचे थोडक्यात कथन असे की, प्रस्तुत प्रकरणात दिनांक २४.०६.२०२४ रोजी निशाणी २९ वरील अर्जावर त्यांचे विना म्हणणे दावा चालविण्यात यावे असा आदेश पारीत करण्यात आलेला आहे. दिनांक २४.०६.२०२४ रोजी व दिनांक ११.०७.२०२४ रोजी अशा दोन्ही तारखेस वादीचे वकीलांची बाहेरगावी कोर्टामध्ये तारखा असल्यामुळे वादी वेळेत आपले निशाणी क्र.२९ वर म्हणणे दाखल करु शकले नाहीत. म्हणून निशाणी २९ वरील विना म्हणणे झालेला आदेश रद्द होणे अत्यंत महत्वाचे आहे. सदर विना म्हणणे झालेला आदेश रद्द न झाल्यास वादीचे अपरिमित नुकसान होणार असून वादीस आर्थिक व मानसिक त्रास सहन करावा लागेल. करिता प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे.

**०३.** प्रतिवादींतर्फे सुविद्य विधिज्ञ यांनी प्रस्तुत अर्जास लेखी म्हणणे सादर केले आहे आणि असे कथन केले आहे की, सदर प्रकरणात प्रतिवादी क्र.१, ४ व ५ यांनी त्यांचा निशाणी क्र.२९ वरील अर्ज दिनांक २२.१२.२०२३ रोजी दाखल केलेला असून वादीने त्याची प्रत दिनांक २०.०१.२०२४ रोजी प्राप्त केलेली आहे म्हणजेच वादीला सदरील बाबीची माहिती असताना देखील वादीने जाणुनबुजून सदर प्रकरण प्रलंबीत ठेवलेला आहे. तसेच वादींचे म्हणणे देणेबाबतचा फक्त एक अर्ज अभिलेखावर आहे. त्याची पुर्ततापण केलेली नाही. सदर अर्जातील मजकूर व अर्ज पूर्णपणे खोटा असून प्रतिवादींना तो मान्य नाही. वादीला वारंवार संधी देवूनही त्यांनी त्यांचे म्हणणे दाखल केलेले नाही. तसेच दिनांक २४.०६.२०२४ रोजी न्यायालयाने केलेला आदेश उचीत आहे. तरी सदरील अर्जावर प्रतिवादींचा तिव्र आक्षेप आहे. करिता प्रस्तुतचा अर्ज जास्तीत जास्त खर्चासह नामंजूर करण्यात यावा.

**०४.** वादींतर्फे विद्वान वकील श्री. एस.बी. चाटे व प्रतिंवादीतर्फे विद्वान वकील श्रीमती ए.बी. डक यांचा युक्तिवाद ऐकला.

**कारणमिमांसा**

**०५.** सदर प्रकरणातील अभिलेखाचे अवलोकन केले. प्रस्तुत प्रकरण हे कायमस्वरुपी मनाई हुकूम व मालकी हक्क जाहीर करणे बाबत दाखल केला आहे. अभिलेखावरुन असे दिसून

येत आहे की, निशाणी क्र.२९ वरील अर्ज दिनांक २२.१२.२०२३ पासुन वादींच्या म्हणणेसाठी प्रलंबीत आहे. वादींना पुरेशी संधी देवूनही त्यांनी निशाणी क्र.२९ वरील त्यांचे म्हणणे दाखल केले नाही. त्यामुळे दिनांक २४.०६.२०२४ रोजी वादींविरुध्द निशाणी क्र.२९ वरील विना म्हणणे आदेश पारीत करण्यात आला. त्यानंतर दिनांक ०१.०८.२०२४ रोजी वादी यांनी सदरचा अर्ज सादर केला आहे. वादी यांनी असे कथन केले आहे की, त्यांच्या वकीलांची बाहेरगावी कोर्टामध्ये तारीख असल्यामुळे त्यांना निशाणी क्र.२९ वर म्हणणे दाखल करता आले नाही. पुरेशी संधी देवूनही वादींनी निशाणी क्र.२९ वरील त्यांचे म्हणणे दाखल केले नाही. त्यामुळे असे स्पष्टपणे दिसून येते की, वादी यांनी सदर प्रकरणात निशाणी क्र.२९ वरील म्हणणे दाखल करण्यासाठी विलंब केलेला आहे.

**०६.** अभिलेखाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, प्रस्तुत प्रकरण हे कायमस्वरुपी मनाई हुकूम व मालकी हक्क जाहीर करणेबाबत दाखल केला असून दोन्ही पक्षांचे अचल संपती बाबत निर्णय होणार आहे. त्यामुळे वादी यांना त्यांचे म्हणणे दाखल करण्याची परवानगी मिळणे आवश्यक आहे. प्रस्तुत अर्ज मंजूर झाल्यास प्रतिवादीं यांचे कोणतेही नुकसान हाोणार नाही. उलट प्रकरण गुणवत्तेवर निकाली काढण्यास मदत होणार आहे. त्यामुळे वादींना त्यांचे म्हणणे दाखल करण्याची परवानगी मिळणे न्यायोचीत आहे. तसेच वादींनी केलेल्या विलंबाबाबत त्यांच्यावर खर्च बसविणे आवश्यक आहे. विलंबाचा कालावधी पाहता वादी यांच्याविरुध्द रु.३००/– खर्च बसविणे योग्य राहिल.

## आदेश

१) प्रस्तुत अर्ज रु.३००/– (रुपये तिनशे फक्त) खर्च बसवुन मंजूर करण्यात येत आहे.

२) वादी यांनी खर्चाची रक्कम रु.३००/– हे प्रतिवादी यांना द्यावी व पुढील तारखेस न चुकता निशाणी क्र.२९ वरील म्हणणे दाखल करावे.

(आदेश खुल्या न्यायालयात जाहिर करण्यात आला.)

स्वा/–

ठिकाण : – अहमदपूर.
दिनांक :– १०.०९.२०२४.

**(के.बी. गाडीवाले)**
सह दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर,
(कोर्ट नं.०४, अहमदपूर).